क्र. १२२ पहिले वर्ष

१ जानेवारी २०२३

# रविवारची उपासना

## ख्रिस्ताब्द २०२३ देवमाता मरीया

### प्रस्तावना

नमस्कार भाविकहो, अखिल सृष्टीचा निर्माता प्रभू परमेश्वर, त्याहून अधिक सामर्थ्यशाली दुसरा कोणीही नाही. साऱ्या चराचरावर त्याचेच साम्राज्य आहे, पण आपले अधिपत्य न गाजवता, तो साऱ्यांची मोठ्या आस्थेने, मोठ्या मायेने काळजी वाहतो. अशा या आपल्या प्रेमळ पित्याने, आपणा सर्वांचे नवीन वर्ष २०२३ मध्ये स्वागत केले आहे. आपणा सर्वांना साल २०२२ मध्ये सांभाळून, हे नवीन वर्ष पाहण्याचे भाग्य लाभू दिले आहे.

आज आपण देवमाता मरीयेचा सण साजरा करत आहोत. ''मरीयेने सर्व गोष्टींचे मनन करून, त्या आपल्या अंत:करणात ठेवल्या'' असे संत लूक आपल्याला सांगतो. तिचा आदर्श नजरेसमोर ठेवून, नवीन वर्षात चांगले जीवन जगण्यासाठी देवमातेचे साहाय्य मागू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या.**

हे प्रभो, आमच्या स्वर्गीय बापा, मरियेचा पुत्र येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे तू आम्हांला जीवन व तारण मिळवून देतोस. कुमारी माता मरिया हिची थोरवी आम्हांस कळून येवो व तिच्या प्रार्थनेचे साहाय्य आम्हांस नित्य लाभो. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

### पहिले वाचन

**गणना या पुस्तकातून घेतलेले वाचन** ६:२२–२७

**''त्यांनी इस्राएल लोकांवर माझे नाव मुद्रित करावे म्हणजे मी त्यांस आशीर्वाद देईन.''**

परमेश्वर मोशेला म्हणाला, ''अहरोन व त्याचे पुत्र यांना असे सांग, तुम्ही इस्राएल लोकांस आशीर्वाद देताना असे म्हणा : परमेश्वर तुला आशीर्वाद देवो व तुझे संरक्षण करो. परमेश्वर आपला मुखप्रकाश तुझ्यावर पाडो व तुझ्यावर कृपा करो. परमेश्वर तुझ्याकडे प्रसन्नमुख करो आणि तुला शांती देवो. या रीतीने त्यांनी इस्राएल लोकांवर माझे नाम मुद्रित करावे म्हणजे मी त्यांस आशीर्वाद देईन.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

६६:२–३,५,६–८

प्रतिसाद : **हे देवा, आम्हांस आशीर्वाद दे.**

१. हे परमेश्वरा, आम्हांवर दया कर, आम्हांस आशीर्वाद दे. तू आपला मुखप्रकाश आम्हांवर पाड. यासाठी की पृथ्वीवर तुझा मार्ग कळावा, सर्व राष्ट्रांस तू सिध्द केलेले तारण समजावे.

२. राष्ट्रे हर्षोत व जयघोष करोत कारण तू राष्ट्रांचा न्याय सरळपणे करतोस व पृथ्वीवरील राष्ट्रांना मार्ग दाखवतोस.

३. हे देवा, राष्ट्रे तुझी स्तुती करोत.
सर्व राष्ट्रे तुझी स्तुती करोत.
देव आम्हांस आशीर्वाद देवो व पृथ्वीच्या सर्व सीमा त्याचे भय धरोत.

### दुसरे वाचन

**पौलचे गलतीकरांस पत्र यातून घेतलेले वाचन ४:४–७**

**''देवाने आपल्या पुत्राला पाठवले, तो स्त्रीपासून जन्मलेला होता.''**

काळाची पूर्तता झाली तेव्हा देवाने आपल्या पुत्राला पाठवले. तो स्त्रीपासून जन्मलेला, नियमशास्त्राधीन जन्मलेला असा होता. यात उद्देश हा होता की, जे नियमशास्त्राधीन होते त्यांना त्याने खंडणी भरून सोडवावे आणि आम्हांला पुत्राचा हक्क मिळावा. तुम्ही पुत्र आहा, म्हणून देवाने अब्बा, बापा अशी हाक मारणाऱ्यांना आपल्या पुत्राच्या आत्म्याला तुमच्या आमच्या अंत:करणात पाठवले आहे. यावरून तू आतापासून गुलाम नाहीस तर पुत्र आहेस आणि पुत्र आहेस तर देवाद्वारे वारसही आहेस.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

इब्री १:१–२

**आलेलुया, आलेलुया!**
देव प्राचीन काळी निरनिराळ्या मार्गे
संदेष्ट्यांच्याद्वारे आमच्या पूर्वजांशी बोलला.
परंतु ह्या अंतिम काळात तो त्याच्या पुत्राद्वारे
आम्हांबरोबर बोलला आहे.
**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**लूकलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन** २:१६–१९

**''मरीया, योसेफ व बाळ ही त्यांना सापडली. आठवा दिवस आला तेव्हा त्याला येशू म्हणण्यात आले.''**

मेंढपाळ घाईघाईने गेले आणि मरीया, योसेफ व गव्हाणीत ठेवलेले बाळ ही त्यांना सापडली. त्यांनी त्यांना पाहिल्यावर ज्या बाळकांविषयी त्यांना जे कळविण्यात आले होते ते त्यांनी जाहीर केले. मग ऐकणारे सर्वजण त्या मेंढपाळांनी सांगितलेल्या गोष्टीवरून आश्चर्यचकित झाले. परंतु मरीयेने या सर्व गोष्टीचे मनन करून त्या आपल्या अंत:करणात ठेवल्या. नंतर ते मेंढपाळ त्यांना सांगण्यात आले होते त्याप्रमाणे त्या सर्व गोष्टी ऐकून व पाहून देवाचा गौरव व स्तुती करीत परत गेले.

आठवा दिवस म्हणजे सुंतेचा दिवस आल्यावर त्याचे नाव येशू ठेवण्यात आले. हे नाव तो उदरात संभवण्यापूर्वीच देवदूताने ठेवले होते.

**प्रभूचे हे शुभवर्तमान.**

### श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक :** माझ्या बंधूभगिनींनो, अखिल मानवजातीचे तारण व्हावे

अशी आमच्या परमेश्वरपित्याची इच्छा आहे. सत्याचे ज्ञान मिळवण्यासाठी तो आम्हांला पाचारण करतो. संपूर्ण अंत:करणाने आपण त्याच्याकडे प्रार्थना करू या.

**प्रतिसाद –** सुखी ठेव तू सर्वांना, देवा आमुची हीच प्रार्थना. (गायनात)

१. संपूर्ण जगात गरीबांवर होणारे अत्याचार, अन्याय थांबून, त्यांना माणूस म्हणून, सन्मानाने जगता यावे म्हणून, आपण प्रार्थना करू या.

२. संपूर्ण जगात ख्रिस्ताचा संदेश स्वीकारला जाऊन, शांती प्रस्थापित व्हावी म्हणून, आपण प्रार्थना करू या.

३. विविधतेने नटलेल्या आपल्या भारत देशातील, विविधतेतील एकता टिकून राहून, जातीय वादाला आळा बसावा, म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. ख्रिस्ताच्या मळ्यात कार्य करण्यासाठी आपल्या परिसरातील अनेक तरुण-तरुणींना, पुढे येण्यास पवित्र आत्म्याची प्रेरणा मिळावी म्हणून, आपण प्रार्थना करू या.

५. येणारे वर्ष आपल्या सर्वांना सुखा-समाधानाचे, आनंदाचे, भरभराटीचे व चांगल्या आरोग्याचे जावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

६. देशाच्या काना-कोपऱ्यात कार्य करणाऱ्या मिशनरी धर्मगुरू, धर्मभगिनी व धर्मबंधू ह्यांच्यावर, प्रभूचा आशीर्वाद असावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

७. आता आपण थोडावेळ शांत राहून वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

## समारोप

हे प्रेमळ परमेश्वरा, तू आमचा आधार आणि सामर्थ्य आहेस. तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक आणि श्रध्देने करीत असलेल्या आमच्या विनंत्या आज मान्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, आमच्या स्वर्गातील बापा, आमच्या मुक्तिकार्याच्या आरंभाचा उत्सव आम्ही या काळात साजरा करीत आहोत. देवमाता मरीया हिच्या सणाच्या ह्या पवित्र दिवशी, आम्हांला पूर्ण मुक्तीचे वरदान प्राप्त व्हावे अशी आम्ही तुझ्याकडे विनंती करतो. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे सर्वसमर्थ परमेश्वरा, पवित्र कुमारी मरीया ख्रिस्ताची तशीच ख्रिस्तसभेचीही माता आहे असे आम्ही घोषित करतो. तिच्या पुत्राबरोबर झालेल्या आमच्या ऐक्यामुळे आम्हांला तारण प्राप्त होवो. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

### प्रभूचे प्रकटीकरण

प्रभू येशूच्या जन्माच्यावेळी भर रात्रीच्या समयी बेथलेहेमच्या परिसरात मोठा प्रकाश पसरला. देवदूतांना पाहून मेंढपाळ घाबरले. मात्र त्यांनी दिलेली सुवार्ता ऐकून ते आनंदित झाले. हा प्रकाश त्या बेथलेहेमपुरता मर्यादित राहिला नाही तो साऱ्या जगात पसरला. तेच प्रकटीकरणाचे रहस्य आज ख्रिस्तसभा साजरे करीत आहे.

**अ) ख्रिस्ताचा प्रकाश मानवाला पुन्हा त्याचा मूळ आशीर्वाद मिळवून देतो :** आजच्या पहिल्या वाचनात (यशया ६०:१-६) यशया संदेष्ट्याने दिलेला आशेचा संदेश प्रकाशाचे प्रतीक वापरतो. तो प्रकाश मानवजात, प्राणिजात व चराचर सृष्टी व्यापून टाकतो. बाबिलोनच्या हद्दपारीतून परतल्यानंतर यहुद्यांनी परमेश्वराच्या आशीर्वादाचा आस्वाद घेतला. प्रभू येशूने तो आशीर्वाद पूर्ण स्वरूपात मानवजातीला मिळवून दिला.

**ब) येशूमधील देवाचे प्रकटीकरण सर्वांसाठी खुले आहे :** आजचे दुसरे वाचन (इफिस ३:२-३, ५-६) इफिसकरांस आपल्या श्रध्देच्या कक्षा रूंदावण्यास आवाहन करते. एकदा का मनुष्याने येशूचा स्वीकार केला की त्याद्वारे मिळणारी शांती, प्रेम व आनंद मनुष्य केवळ स्वत:पुरता ठेवू शकत नाही. हे प्रकटीकरण इतरांना लाभावे म्हणून ख्रिस्ती व्यक्तीने आपल्या शब्दांद्वारे, जीवन व कार्याद्वारे आपल्या श्रध्देची साक्ष द्यायला हवी.

**क) ख्रिस्त हा आपल्या श्रध्देच्या प्रवासातील मार्गदर्शक तारा होय :** आजच्या शुभवर्तमानात (मत्तय २:१-१२) तीन मागी लोकांचा प्रवासवर्णन करण्यात आलेला आहे. ताऱ्याचा मागोवा घेत ते प्रथम जेरूसलेमला आणि तद्नंतर बेथलेहेमला पोहोचले. मात्र येशूची भेट झाल्यानंतर त्यांना ताऱ्याची गरज भासली नाही कारण साक्षात् जगाचा प्रकाश त्यांना सापडला होता. (स्वप्नामध्ये) मिळालेल्या त्याच्या मार्गदर्शनाखाली ते नवीन जीवनमार्ग चोखाळत राहिले. ख्रिस्त त्यांच्या श्रध्देच्या प्रवासातील मार्गदर्शक तारा बनला.

**आत्मपरीक्षण :** प्रभू येशूला भेटल्यानंतर मला जो आनंद, प्रेम व शांती लाभलेली आहे ती मी कशाप्रकारे इतरांपर्यंत पोहोचवतो? मागी लोकांचा प्रवास माझ्या श्रध्दामय जीवनावर कोणता प्रकाश टाकतो?

●●●

| जानेवारी २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | दुसरा सप्ताह |
|---|---|---|
| सोम ०२ | सं. बेसील महान (पां) | : १ योहान २:२२-२८/योहान १:१९-२८ |
| मंगळ ०३ | येशूचे पवित्र नाव (पां) | : १ योहान २:२९-३:६/योहान १:२९-३४ |
| बुध ०४ | सं एलिझाबेथ (पां) | : १ योहान ३ : ७-१०/योहान १:३५-४२ |
| गुरू ०५ | सं जॉन नेपोम्युसिन न्यूमन (पां) | : १ योहान ३ :११-२१/योहान १:४३-५१ |
| शुक्र ०६ | प्रकटीकरण सोहळा (पां) | : यशया ६०:१-६/इफिस ३:२-३:५-६/मत्तय २:१-१२ |
| शनि ०७ | सं रेमंड (पां) | : १ योहान ३:२२-४:६/ मत्तय ४:१२-१७,२३-२५ |


**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)